मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# त्या शाळा उपसंचालकांच्या नोटीसबरोबरच दर्शनी भागावर फलक लावण्याचे आदेश!

## शाळांच्या मान्यता कागदपत्रांची तपासणी करावी : संजय नाईकडे

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

शहरात अनेक वर्षापासून बिनदिक्कतपणे सुरू असलेल्या अनधिकृत शाळा शिक्षण उपसंचालकांच्या रडारवर आल्या आहेत. आता या शाळांना नोटीस बजावण्याबरोबरच शाळांच्या मुख्य दर्शनी भागावर 'अनधिकृत शाळा 'असा फलक लावण्याचे आदेश दिले आहेत.

महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून शाळांचे सर्वेक्षण केल्यानंतर सात अनधिकृत शाळा आढळून आल्या. यामध्ये ज्ञानराज प्राथमिक शाळा; कासारवाडी, मॉडर्न पब्लिक स्कूल; रहाटणी, माने इंग्लिश स्कूल; राजवाडेनगर काळेवाडी, काकाज इंटरनॅशनल स्कूल; काळेवाडी, होली मिशन इंग्लिश मीडियम स्कूल; नवी सांगवी, सेंट रोझरी स्कूल; चिखली, माऊंट एव्हरेस्ट स्कूल; कासारवाडी या शाळांचा समावेश आहे. या शाळेत पालकांनी आपल्या मुलांना प्रवेश घेऊ नये, असे आवाहन प्रशासन अधिकारी संजय नाईकडे यांनी केले होते. यानंतर या शाळांना नोटीस बजावली. मात्र, या नोटिशीकडे दुर्लक्ष करत, या शाळा बिनदिक्कतपणे सुरु आहेत.

अनधिकृत शाळांबाबत शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक आणि शिक्षण उपसंचालक यांच्याकडून आलेल्या सूचनांनुसार, अनधिकृत शाळांवर शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदींनुसार शाळा बंद करणे, दंडात्मक कारवाई करणे, आवश्यकतेप्रमाणे



'एफआयआर' दाखल करणे, शाळेच्या मिळकतीच्या सातबारावर आकारणी केलेल्या दंडाचा आर्थिक बोजा चढविणे, शाळा अनधिकृत असल्याबाबत वर्तमानपत्रात बातमी प्रसिद्ध करणे व विद्यार्थ्यांचे अन्य शाळांमध्ये सुयोग्य समायोजन करण्याबाबत निर्देश कार्यालयास दिले आहेत.

अन्यथा शिस्तभंगाची कारवाई

राज्यातील अनधिकृतपणे चालविल्या जाणाऱ्या शाळांची संख्या आणि या शाळांमधील विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा निर्माण होणारा प्रश्न यामुळे कोणत्याही भागात अनधिकृत शाळा सुरु झाल्यास संबंधित शिक्षणाधिकारी यांना जबाबदार धरण्यात येणार आहे. त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे शिक्षण उपसंचालकांनी जाहीर केलेले आहे.

अशी करा कारवाई

महापालिका कार्यक्षेत्रात सुरु असलेल्या शाळांच्या मान्यता कागदपत्रांची तपासणी करावी. अनधिकृत शाळा आढळून आल्यास कार्यालयास त्याबाबत अहवाल सादर करून शाळा बंद करण्यासाठी नोटीस देऊन शाळा बंद करावी. अनधिकृत शाळेच्या दर्शनी भागावर अनधिकृत शाळा असल्याबाबत फलक लावण्यात यावा. पालकांना जागृत करावे. शाळा बंद करण्यासाठी नोटीस देऊनही शाळा बंद न झाल्यास शासन निर्णय ता. १९ जून २०१० व ता. १० नोव्हेंबर २०२० मधील तरतुदीनुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान केले. या प्रकरणी या शाळेवर एक लाख व प्रती दिन १० हजार इतक्या रकमेचा दंड आकारून कार्यवाही सुरु करण्यास सांगितले आहे.

> 'कोणत्याही परिस्थितीत महापालिका कार्यक्षेत्रात अनधिकृत शाळा सुरु राहणार नाही. याची सर्व विभागीय पर्यवेक्षकांना सूचना दिल्या आहेत. विभागीय पर्यवेक्षकांच्या नियंत्रित भागात अनधिकृत शाळा सुरु राहिल्यास त्याप्रकरणी संबंधितास जबाबदार धरून शिस्तभंग विषयक कारवाई करणार आहे.
>
> – संजय नाईकडे,
> प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग.

# एकांकिकेने नाट्य संमेलनाचा दुसरा दिवस गाजवला

## पिंपरी- चिंचवडकरांनी सांस्कृतिक मेजवानी अनुभवल्याचे चित्र

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

लावणी महोत्सव, काव्य पहाट, लोकनृत्य, एकांकिका अन् अनेक नाटकांच्या सादरीकरणाने आज शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचा दुसरा दिवस गाजवला. रविवार सुट्टीचा दिवस असल्याने नाट्य रसिकांनी नाट्य संमेलनाच्या सर्वच ठिकाणी मोठी गर्दी केली होती. या नाट्य संमेलनाच्या रूपाने



पिंपरी – चिंचवडकरांनी सांस्कृतिक मेजवानी अनुभवल्याचे चित्र होते.

यावेळी नाट्य संमेलनाचे आयोजक भाऊसाहेब भोईर, उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, कार्याध्यक्ष राजेशकुमार साकला आणि आदी मान्यवर उपस्थित होते.

शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनात दुसऱ्या दिवशी ग.दि माडगूळकर नाट्यगृहातील कार्यक्रमाची सुरूवात ही काव्य पहाटेने झाली. त्यानंतर तपस्विनी संस्था यांच्या वतीने गणेश वंदना सादर करण्यात आली. वर्ध्याच्या अध्ययन भारतीय संच टीमने 'तेरवं'हे दोन अंकी प्रायोगिक नाटक सादर करण्यात आले. या नाटकामध्ये शेतकऱ्यांच्या मुली,घटस्फोटीत महिला,पीएचडी करणाऱ्या महिला यांनी अत्यंत ताकदीने अभिनय करून प्रेक्षकांना अंतर्मुख केले. स्त्री शिक्षण आणि स्त्री जागर हा या नाटकाचा विषय होता. नगरचे रंगकर्मी पी. डी. कुलकर्णी यांच्या हस्ते या संचाचा गौरव करण्यात आला.

त्यानंतर राखाडी स्टुडिओ निर्मित 'उच्छाद' हे विनोदी नाटक सादर करण्यात आले. या नाटकाला प्रेक्षकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

